मराठवाड्यातील विविध धर्माच्या निवडक देवस्थानांची भक्तीसंगीत परंपरा : एक चि□त्सक अभ्यास

प्रस्तावना :-

मानवी प्रबोधनाचे अत्यंत प्रभावी माध्यम म्हणजे संगीत होय. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. विविध जातीधर्माचे लोक हजारो वर्षापासून □ुण्यागोविंदाने एकत्र नांदत आले आहेत. प्रत्येक धर्माची अशी एक खास धार्मिक परंपरा चालत आलेली आहे. प्रत्येक धर्मात संगीताला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. संगीताच्या माध्यमातून कोणतीही गोष्ट सोप्या मार्गाने मानवी मनावर बिंबवता येते.

भारतीय संगीताला अत्यंत प्राचीन परंपरा लाभलेली आहे. संगीताची उत्पत्ती □व्हा आणि कधी झाली हे सांगणे कठी□ आहे. कारण मानवाला लेखन कला अवगत होण्याअगोदर पासूनच संगीत कलेचे ज्ञान अवगत झालेले होते. त्याकाळी संगीत □ला मौखिक पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेली आहे.

भारतीय संगीताचा लिखीत इतिहास वेद वाङ्मयातून मिळतो. वैदि□ युगाचा प्रारंभ भारतात आर्यांच्या आगमनापासूनचा मानतात. वैदि□ □ाळात यज्ञाच्या वेळी ऋचा गायन म्हणजे संगीताचाच वापर होत होता. म्हणजेच संगीत व धार्मिक परंपरा यांचा संबंध वैदि□ परंपरेतून सुरू झालेला आहे. संगीत व धार्मिक परंपरा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण या दोघांना वे□ळे □रताच येणार नाही.

अनेक संतांनी आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी संगीताचाच आधार घेतलेला आहे. उदा :- संत कबीर हे एकतारी हातात घेवून आपले दोहे सादर □रीत असत, संत तुकाराम महाराज हे वीणा व चिपळ्या हातात घेवून आपले अभंग

व कीर्तन सादर करत असत, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे खंजीरी वाजवून समाज प्रबोधन करीत असत, तर संत गाडगे महाराज दगडाच्या माध्यमातून ताल आणि ध्वनी -िर्मा□ □रू-न समाज प्रबोधन करीत असत, तसेच संत जनाबाई जात्यावर दळण दळीत असताना त्या जात्यावरील ओव्या गात असत. असे संगीत परंपरेची कित्येक उदाहरणे देता येतील.

मराठवाडा ही संतांची भूमी आहे. भारताच्या धार्मिक उत्त्थानात मराठवाड्यातील अनेक संतांनी योगदान दिलेले आहे.

प्रत्येक धर्माने संगीताला महत्त्वाचे स्थान दिलेले दिसून येते, उदा. आपण दै-ंदि-न जीवन जगत असताना ऐकत असलेली मुस्लिम धर्मीयांची 'आजान', शी□ धर्मीयांचे 'शबद गायन', ख्रिश्चन चर्चमधून ऐकू येणारी 'प्रार्थना', बौद्ध धर्मीयांचे 'त्रि-सर□'-'पंचशील' तसेच हिंदु धर्मातील देवी देवतांच्या आरत्या, भज-े, ओव्या, पद, कीर्तन याप्रसंगीही संगीताला महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते.

मराठवाड्यात अशी अनेक देवस्थाने आहेत जेथे वेगवेगळ्या धार्मि□ स□-उत्सवांच्या वेळी भक्तीसंगीताचे आयोजन केले जाते. उदा- अंबड येथील 'दत्त जयंती महोत्सव', माहूर येथील 'ललित पंचमी भक्ती संगीत सोहळा', परभणी येथील हाजी तुरूतपीरदर्गा येथील ऊर्स निमित्ताने होणाऱ्या कव्वालीच्या मैफिली, हिंगोली जिल्ह्यातील औंढा ना□नाथ येथील महाशिवरात्री निमित्य चालणारे विविध भक्ती संगीताचे चालणारे कार्यक्रम, औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे दरवर्षी होणारा -ाथषष्टी सोहळा तसेच नांदेड येथील गुरूद्वारामध्ये चालणारे विविध भक्ती संगीताचे □ार्य□म इत्यादी.

अशा विविध धर्माच्या भक्तीसंगीताचा अभ्यास या निमित्ताने करावयाचा आहे. म्हणून मी प्रस्तुत विषय हा "मराठवाड्यातील विविध धर्माच्या निवडक देवस्थानांची

भक्तीसंगीत परंपरा : एक चिकित्सक अभ्यास" घेतलेला आहे. या माध्यमातून पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या या भक्तीसंगीत परंपरेचे समाजातील स्थान व महत्त्व □से आहे तसेच भक्तीसंगीत परंपरेचे स्वरूपचाही उलगडा या संशोधन कार्यातून □रणार आहे.

अभ्यास विषयाचे महत्त्व (Significance of Study) :-

समाज प्रबोधनाचे अत्यंत प्रभावी माध्यम म्हणजे संगीत होय. अनेक धर्म अनुयायांनी आपल्या धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी संगीताचेच माध्यम निवडले असल्याचे निदर्शनास येते.

मराठवाडा ही संताची भूमी आहे. भारताच्या उत्थानात मराठवाड्यातील अनेक संतां-नी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

अशा विविध धर्माच्या भक्तीसंगीताचा अभ्यास या निमित्ताने करावयाचा आहे. या परंपरेला अत्यंत समृद्ध वारसा लाभलेला आहे. या माध्यमातून विविध धर्माच्या भक्तीसंगीताचा अभ्यास करता येईल व मराठवाड्यातील भक्तीसंगीताची दिशा आणि दशा स्पष्ट होईल.

उद्दिष्ट्ये (Objecitves) :-

(1) मराठवाड्यातील विविध धर्माच्या निवडक भक्ती संगीताचा अभ्यास करणे.

(2) मराठवाड्यातील भक्ती संगीत परंपरेचे स्वरूप स्पष्ट करणे.

(3) मराठवाड्यातील विविध धार्मिक स्थळांतून संगीताचा प्रचार व प्रसार कसा झाला याचा अभ्यास करणे.

(4) मराठवाड्यातील धार्मिक संस्थानांकडून भक्ती संगीताच्या प्रचारासाठी आज □ोणकोणते उपक्रम राबविले जातात याचा अभ्यास करणे.

□ृहितके (Hypothesis) :-

(1) मराठवाड्याला संताची उज्वल परंपरा लाभलेली आहे.

(2) मराठवाड्यातील धार्मिक संस्थांनावर भारतीय संगीताचा प्रभाव आहे.

(3) धार्मिक देवस्थांनातील कार्यक्रमातून संगीताचा प्रचार व प्रसार झाला आहे.

(4) धार्मिक संस्थानांकडून वापरल्या जाणाऱ्या भक्तीसंगीताला अध्यात्माची जोड आहे.

(5) भारतीय संगीतातील अनेक गीत प्रकार धार्मि□ संस्थानांतून निर्माण झाले आहे.

संकल्पनांचे स्पष्टीकरण :-

(1) संगीत :- □ायन, वादन व नृत्य या तिन्ही कलांच्या समुहास संगीत असे म्हणतात.

(2) भक्तीसंगीत :- ईश्वर प्राप्तीसाठी भक्ताने परमेश्वराची केलेली आराधना म्हणजे भक्ती संगीत होय.

(3) देवस्था-न :- धर्माच्या सर्वांगीण विकासासाठी निर्माण झालेल्या संस्थेला देवस्थान असे म्हणतात.

(4) धर्म :- मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेली विशिष्ट तत्त्वप्रणाली म्हणजे धर्म होय. उदा. हिंदु, मुस्लिम, शी□ा, जैन, ईसाई, बौद्ध इ.

(5) परंपरा :- पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या चालीरिती म्हणजेच परंपरा होय.

संशोधन पद्धती (Research Methodology) :-

संशोधन हे सामाजिक जीवनाच्या विविध पैलूंच्या संदर्भात अध्ययन करण्याची एक वैज्ञानिक योजना आहे.

संशोधन एक शास्त्रीय पद्धती असून तीचा उद्देश तार्किक आणि क्रमबद्ध पद्धतीद्वारा नवीन तथ्यांचा शोध घेणे □ंवा जुन्या तथ्यांचे पुनर्परीक्षण आणि त्यांच्यात आढळून येणारे अनुक्रमे अंत:संबंधी कार्यकारणभाव आणि त्यांना संचलित करणाऱ्या नैसर्गिक नियमांचे विश्लेषण करणे हा आहे.

"सत्याकरिता कोणताही लघुमार्ग नाही. विश्वाचे ज्ञान प्राप्त करण्याकरीता शास्त्रीय पद्धतीच्या मार्गाशिवाय दुसरा मार्ग नाही"- □ार्ल पिअर्स-ा.

अ) संशोधन आराखडा (Research Design) :-

संशोधनाच्या उद्देशाची प्राप्ती आणि संशोधनाला सुयोग्य दिशा देण्यासाठी यासंबंधीत संशोधन आराखडा तयार केला जातो. संशोधन समस्येचा विचारपूर्वक अंदाज घेवून त्या समस्येच्या निराकरणासाठी संशोध-ा आराखड्याचे स्वरूप निश्चित □रावे लागते. प्रत्येक संशोध-ा □ार्यासाठी संशोधन आराखड्याचे विशेष महत्त्व आहे.

❖ व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitation) :-

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश मराठवाड्यातील विविध धर्माच्या निवडक देवस्थानांची भक्तीसंगीत परंपरा या मोठ्या क्षेत्रावर जरी आधारीत असला तरी यात □ाही निवडक धार्मिक संस्थानातील भक्तीसंगीताचा अभ्यास करण्यात येणार आहे. अशाप्रकारे संशोधनाची दिशा ठरवून तथ्य संकलनासाठी गुणात्मक व संख्यात्मक अध्ययन केले जाईल व त्या आधारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण करून निष्कर्ष □ाढले जातील.

ब) तथ्य संकलन (Data Collection) :-

तथ्य एक अनुभव सिद्ध सत्यापनीय निरीक्षण आहे. तथ्यांचा शोध घेण्यासाठी शोध आणि स्वरूप या आधारावर मुख्यतः दोन प्रकार आहेत.

(1) प्राथमिक तथ्य (Primary Data)

(2) द्वितीय तथ्य (Secondary Data) या आधारे संशोधनपूरक तथ्य संकलित करणार आहे.

संशोधनात तथ्य हे महत्त्वाचे असतात. तथ्यांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. म्हणूनच तथ्यांचे शास्त्रीय संकलन करणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी उपरोक्त दोन प्रकारच्या तथ्य संकलनाचा उपयोग रण्यात येईल.

(1) प्राथमिक तथ्य (Primary Data) :-

प्राथमिक तथ्यांचे स्रोत म्हणून मुलाखत, अनुसूची या तंत्राचा वापर केला जाईल. या तथ्यांमध्ये संशोधनकर्ता स्वतः अध्ययन क्षेत्रात जावून संशोध-न विषयासंबंधीत जीवंत व्यक्तींकडून मुलाखत किंवा प्रश्नावलींच्या साह्याने तथ्यांचे संकलन करण्यात येईल.

(2) द्वितीय तथ्य (Secondary Data) :-

ही तथ्ये इतर व्यक्तीने पूर्वीच गोळा केलेली असून ती लिखीत स्वरूपात असतात. सदरील अभ्यासासाठी दुय्यम तथ्यांचे स्रोत म्हणून विविध ग्रंथालयात उपलब्ध असणारे विविध संदर्भग्रंथ, अप्रकाशित शोधप्रबंध, ज्ञान-ोश, वर्तमानपत्रे, शासकीय अहवाल, साप्ताहिके, मासिके, नियतकालिके, संकेतस्थळे किंवा शासनाकडून प्रसिद्ध होणारे प्रसिद्धी पत्रके यातून माहिती प्राप्त केली जाईल.

क) नमुना निवडीचे तंत्र (Sampling Technique) :-

असंभाव्यता नमुना पद्धती मधील सोयीस्कर किंवा सुविधाजनक नमुना घेतला जाईल.

ड) अनुमापन तंत्र (Scaling Technique) :-

अनुमापन तंत्र किंवा साधनांद्वारे कोणत्याही गुणात्मक तथ्यांचे किंवा घटनांचे मापन केले जाते. याचाच अर्थ गुणात्मक तथ्यांचे, गुणात्मक स्वरूपात मापन करण्याची पद्धती म्हणजे अनुमापन तंत्र होय.

ई) -ामु-ा आकार (Sampling Size) :-

संशोधन करण्यासाठी संशोधकाने महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागाची निवड केलेली आहे. मराठवाड्यात असलेल्या विविध धर्माच्या निवडक देवस्थांनांची / स्थळांची भक्ती संगीत परंपरेत सहभागी असलेल्या किंवा झालेल्या उत्तरदात्यांकडून तथ्य गोळा करून संशोधन पूर्ण केले जाईल. यामध्ये 100 नमुन्यांचा समावेश करून तथ्य गोळा केले जातील व वस्तुनिष्ठ माहिती मिळविली जाईल.

प्रकरण रचना (Chapter Plan)

प्रकरण पहिले - मराठवाड्याचा सर्वांगीण आढावा

(1) मराठवाड्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

(2) मराठवाड्याची भौगोलिक पार्श्वभूमी

(3) मराठवाड्याची राजकीय स्थिती

(4) मराठवाड्याची सामाजिक स्थिती

(5) मराठवाड्याची आर्थिक स्थिती

प्र□र□ दुसरे - मराठवाड्याची प्राचीन सांस्कृतिक पार्श्वभूमी

(1) मराठवाड्याची सांस्कृतिक परंपरा व संगीत.

(2) मराठवाड्यातील साहित्यिक / कवी.

(3) मराठवाड्यातील संगीतकार, कलाकार, गायक, वादक.

प्रकरण तिसरे - मराठवाड्यातील प्रचलित संगीत प्रकारांचा अभ्यास

(1) लोकसंगीत

(2) शास्त्रीय संगीत.

(3) उपशास्त्रीय संगीत.

(4) सुगम संगीत.

प्रकरण चौथे - मराठवाड्यातील भक्तीसंगीतासाठी कार्य करणाऱ्या धार्मिक संस्थांनाचा इतिहास व विकास

(1) धार्मिक संस्थांची उत्पत्ती

(2) धार्मिक संस्थांनाचा विकास

    (1) प्राचीनकालीन धार्मिक संस्थाने

    (2) मध्ययु□ी-न धार्मि□ संस्था-ने

    (3) आधु-नि□ □ाली-न धार्मि□ संस्था-ने

प्रस्तुत प्रकरणामध्ये तत्कालीन मराठवाड्यातील भक्तीसंगीताची अवस्था व संगीत जीवंत ठेवणाऱ्या धार्मिक संस्थानांचा इतिहास व विकास यांचा अभ्यास केला जाईल.

प्र□र□ पाचवे - धार्मिक संस्थानातील संगीत व भारतीय संगीत यांचा परस्पर संबंध

(1) शास्त्रीय संगीत व धार्मिक संगीत

(2) सुगम संगीत व धार्मिक संगीत

(3) लोक संगीत व भक्ती संगीत

प्रस्तुत प्रकरणामध्ये धार्मिक संस्थानांतील संगीत व भारतीय संगीत यातील परस्पर संबंधाचे अध्ययन करण्यात येईल.

प्र□र□ सहावे - मराठवाड्यातील विविध धर्मांतील भक्तीसंगीताचे तुलनात्मक अध्ययन

(1) हिंदू

(2) शी□

(3) बौद्ध

(4) मुस्लिम

(5) जैन

(6) ख्रिश्चन

प्रस्तुत प्रकरणांमध्ये विविध धर्माच्या भक्तीसंगीत सादरीकरणाच्या शैलींचा तुलनात्मक अभ्यास केला जाईल.

प्रकरण सातवे - उपसंहार / निष्कर्ष

उपरोक्त प्रकरणामध्ये संशोधनांती हाती आलेले निष□र्ष या प्र□र□ामध्ये नोंदविण्यात येतील.

प्रकरण आठवे - परिशिष्ट्ये

संदर्भग्रंथ

(1) मराठवाड्याचा इतिहास - डॉ. काटे

(2) भारतीय संगीत व धर्म - चौधरी महाराज

(3) समर्थ रामदासांचे संगीत चिंतन - डॉ. कमलाकर परळीकर- संस्कार प्रकाशन, लातूर.

(4) मराठी संतांचे सामाजिक कार्य - डॉ. वि. भ. कोलते, 1984.

(5) मराठवाड्यातील अभीजात संगीत-अंजली मारूळकर-सुमेरू प्रकाशन डोंबिवली (पूर्व), मुंबई.

(6) संगीत महर्षी डॉ. अण्णासाहेब गुंजकर- प्रा.पी.जी. जोशी- अदित्य प्रकाशन, नांदेड.

(7) मासिके व वर्तमानपत्रातील वेळोवेळी प्रकाशित झालेले संबंधित लेख.

    (1) संगीत कला विहार- गांधर्व म. वि. मंडळ, मिरज.

    (2) संगीत - संगीत कार्यालय, हाथरस.

मार्गदर्शक
प्रा. डॉ. राम बोरगांवकर
संगीत विभाग प्रमुख
सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर

संशोधक
विनोद प्रकाशराव रा□ी
(एम. ए. संगीत, नेट)